# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 30233447/422 फॅक्स -2269 2102/2269007.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


---

**<u>अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित</u>** क्रमांक: 2अ/एडीएम/2013/ 362
दिनांक :15.6.2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

**विषय : शैक्षणिक वर्ष 2013-14 मधील सर्व व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अल्पसंख्यांक संस्थांच्या अल्पसंख्यांक कोटयातील जागा व विनाअनुदानीत संस्थांच्या संस्थास्तरावरील जागांबाबत ...**

शैक्षणिक वर्ष 2013-14 साठी व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहेत. संचालनालयाच्या वतीने राबविल्या जाणा-या प्रवेश प्रक्रियेसाठी अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या संस्था तसेच खाजगी विनाअनुदानीत संस्था अनुक्रमे अल्पसंख्यांक कोटयातील तसेच संस्थास्तरावरील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी शासनाकडे समर्पित करतात.

यासंदर्भात कळविण्यात येते की, शासन निर्णय अल्पसंख्यांक विभाग क्रमांक **<u>अशैसं-2012/ प्र.क्र.21/ कार्या-5,दिनांक 27.5.2013</u>** अन्वये राज्यातील अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांसाठी कार्यपध्दती निर्धारीत करण्यात आली आहे (सोबत छायाप्रत जोडली आहे). त्यामधील प्रवेशासंदर्भातील तरतूद 10) iv)ब) नुसार अनुदानीत अल्पसंख्यांक संस्थांनी त्यांच्या मंजूर प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी 50%जागांवर क) नुसार विनाअनुदानीत अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी 51% जागांवर त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा असे नमूद केलेले आहे. ई) नुसार <u>बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी देणेबाबतच्या तरतूदी</u> स्पष्ट केलेल्या असून त्या पुढीलप्रमाणे आहेत : अल्पसंख्यांक कोटयातील जागा भरण्यासाठी कमीत कमी चार मुख्य वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक राहील. सदर चार जाहिरातीपैकी 2 जाहिराती राज्य स्तरावरील व 2 जाहिराती राष्ट्रीय स्तरावरील तसेच एक मराठी , दोन इंग्रजी ,संबंधित भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रदान असणा-या अल्पसंख्यांक भाषेत ही जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक असणार आहे. **अल्पसंख्यांक कोटयात बिगर अल्पसंख्यांक उमेदवारांना प्रवेश देण्यासाठी संस्थांनी या जाहिरातींसह अर्ज करून अल्पसंख्यांक विभागाची विनिर्दिष्ट पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अल्पसंख्यांक विभागाकडून तशी मान्यता देण्यात येईल.**

**<u>अल्पसंख्यांक विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय अल्पसंख्यांक कोटयातील जागांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश करू नये असे स्पष्ट निर्देशही सदर शासन निर्णयात देण्यात आलेले आहेत.</u>**

वरील निर्देशांचा व तरतूदींचा विचार करता संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त काही संस्थांकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी सुरू होण्यापूर्वी अल्पसंख्यांक कोटयातील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित केल्या जातात. दिनांक 27.5.2013 च्या शासन निर्णयातील तरतूदी आणि निर्देशाचा विचार करता कोणत्याही अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्यांक कोटयातील 51% जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी बिगर अल्पसंख्यांक कोटयातून भरण्यासाठी अल्पसंख्यांक विभागाची पूर्वपरवानगी अनिवार्य (compulsory) आहे. त्यामुळे या शैक्षणिक वर्षात (2013-14)

ज्या अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांनी अल्पसंख्यांक कोटयातील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित केल्या आहेत अशा संस्थांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत ही बाब सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावी.

तसेच खाजगी विनाअनुदानीत संस्था आणि अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांना 20टक्के संस्थास्तरावरील जागा असतात. त्या 20 टक्के जागांपैकी किती टक्के जागा संबंधित संस्था भरणार आहे याची माहिती संस्थेच्या संकेतांक (Institute Code) चा उपयोग करून Log In केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रम आणि विषयनिहाय जागांची टक्केवारी ऑनलाईन नमूद करून त्याची प्रत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्रीभूत प्रवेश पध्दतीमध्ये उपलब्ध होणा-या जागा विद्यार्थ्यांना दर्शविण्यात येतील.

या विषयानुषंगाने ज्या संस्थांनी संचालनालयाकडे पत्र सादर करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी भरावयाच्या जागांची माहिती दिलेली आहे त्या संस्थांनीही ती माहिती नव्याने ऑनलाईन भरणे आवश्यक राहील ही बाबही सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावी.

खाजगी विनाअनुदानीत संस्थांना त्यांच्या संस्थास्तरावरील तसेच अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत संस्थास्तरावरील जागांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी **दिनांक 17.6.2013 पर्यंत व भरलेली माहिती आपल्या कार्यालयास सादर करण्यासाठी दिनांक 18.6.2013 पर्यंत मुदत** देण्यात येत आहे. या मुदतीत संस्थांनी जागा संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट कराव्यात असे आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात यावे.

सही/-
( डॉ. सुभाष महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई